त्यापावेतोचे कर मी लिहून देणार यांनी तुम्हांस भरून द्यावयाचे आहे.

०६) सदर फ्लॅट सिस्टीम इमारतीचे प्लॉट जागेत उपरोक्त फ्लॅट मिळकतीचा .... चौरस मीटर (०.००%) अविभाज्य हिस्सा राहावयाचा आहे व तो तुम्हांस कधीही विभागुन मागता येणार नाही.

०७) सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीबाबत मी लिहून देणार यांचे मालकी हक्काबाबतचे संपूर्ण कागदपत्रे तुम्ही लिहून घेणार यांनी प्रत्यक्षात पाहिलेले आहे. तसेच सदरची फ्लॅट मिळकत ज्या ठिकाणी बांधली जात आहे ती प्लॉट जागा व त्यावरील सुरु असलेले बांधकामसुध्दा तुम्ही लिहून घेणार यांनी प्रत्यक्ष पाहुन खात्री करून घेतलेली आहे व तदूनंतरच तुम्ही लिहून घेणार यांनी उपरोक्त फ्लॅट मिळकत खरेदी घेणेचा सौदा मी लिहून देणार यांचेसोबत केलेला आहे.

०८) उपरोक्त फ्लॅट मिळकत धारकाने मागितल्याप्रमाणे त्यांना लिहून देणार यांनी सदर जमिनीसंबंधी स्वामीत्व, खरेदीखते, ७/१२ चे उतारे, 'ड' पत्रक नोंदी, बिनशेती परवानगी, मंजूर नकाशा प्रत, अभिन्यांस प्रत, सोई सुविधांची यादी, वकीलांचे टायटल सर्टिफिकेट, घोषणा पत्र (डीड ऑफ डिक्लरेशन) वगैरे जी जी कागदपत्रे महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप अॅक्ट, १९७० प्रमाणे दाखविणे व देणे आवश्यक आहे ती ती सर्व

कागदपत्रे फ्लॅट धारक यांना दाखविलेले आहेत व त्याच्या झेरॉक्स प्रतीही दिलेल्या आहेत.

०९) सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीचे खरेदीखात मी तुम्हांस दिनांक .... चे दिवशी किंवा त्याआधी तुमचेपासुन भरण्यात नमुद केल्याप्रमाणेची संपूर्ण रक्कम मला मिळालेनंतर तुमचे नांवाने लिहून व नोंदवुन देईल व त्याच दिवशी सदर फ्लॅट मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा तुम्हांस देईल. सदर उपरोक्त मुदतीत फ्लॅट मिळकतीचे खरेदीखात करून देणे व घेणे ही मुख्य व महत्वाची अट आहे. सबब याचे जो कोणी उल्लंघन करेल तो दुसऱ्यास नुकसानी व खर्च देणेस जबाबदार राहील.

१०) सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीचे खरेदीखात मी तुम्हांस दिनांक .... चे आधी किंवा सदनिकेला रहिवास दाखला मिळाल्यापासुन दोन महिने म्हणजेच ६० (साठ) दिवसाच्या आंत करावयाचे आहे.

११) सदर सौदापावती करारान्वये तुम्हांस विक्री करीत असलेली फ्लॅट मिळकत मी कोठेही गहाण, दान, खरेदी, बक्षीस अगर अन्य जडजोखमी मध्ये, जप्तीत, जामीनकीत, करारात, वारसाहक्कात, मृत्युपत्रात वगैरेत दिलेली नाही. तसेच कुठल्याही न्यायालयीन वादात अडकलेली नाही. सदर फ्लॅट मिळकतीचे खरेदीखात मी तुम्हांस निर्वेध, निजोखामी व बोझे विरहित असे लिहून व नोंदवुन देईल.

१२) दिनांक .... चे विवशी किंवा त्याआधी तुम्ही मला भरण्यात नमुद केल्याप्रमाणेची बाकी राहिलेली रक्कम बांधकामाचे प्रगतीनुसार वेळचेवेळी देणे व मी तुम्हांस सदर फ्लॅट मिळकतीचे बांधकाम पुर्ण करून फ्लॅट मिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवुन तुमचे प्रत्यक्ष कब्जात देणे ही या सौदेपावती करारातील महत्वाची अट आहे व जो कोणी या अटीचा भंग करेल तो दुसऱ्यास रेरा कायद्यातील तरतुदीच्या आधिन राहुन १२% द.सा.द.शे. प्रमाणे व्याज व नुकसान देण्यास पात्र राहील. तसेच सदरचे मुदतीत बाकी राहिलेली रक्कम तुम्ही लिहून घेणार यांनी मी लिहून देणार यांना न दिल्यास तुम्हांस एक महिन्याची नोटीस देण्यात येईल व एक महिन्यानंतरही सदर राहिलेली रक्कम व त्यावरील व्याज न दिल्यास ठरलेल्या संपूर्ण रक्कमेपैकी ८% रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचा सौदापावती करारनामा एकतर्फी रद्द समजण्यात येईल व तुम्ही दिलेल्या रक्कमेपैकी बाकी राहिलेली रक्कम रेरा कायद्यातील तरतुदीनुसार परत करण्यात येईल.

१३) लिहून देणार हे सदर फ्लॅट मिळकतीचे आज सौदापावती तारखेपासुन दिनांक .... पावेतो रेरा कायद्यातील तरतुदीच्या आधीन राहुन बांधकाम पुर्ण करण्याची हमी देत आहे. तथापी काही अपरिहार्य घटना घडल्यास किंवा भूकंप, आंग, पूर, दंगा या सारख्या नैसर्गिक आपत्तीने किंवा पाण्या अभावी काम खोळंबल्यास किंवा बिल्डींग मटेरीअल मिळणे

बाजारात दुरापास्त झाल्यास किंवा बिल्डींग कामगार मिळणे कठीण झाल्यास व त्यामुळे बांधकामास किंवा प्रत्यक्ष कब्जा व ताबा देण्यास विलंब झाल्यास त्यासाठी लिहून देणार यांना जबाबदार धरण्यात येणार नाही.

१४) सदर प्लॉट जागेवर मी लिहून देणार यांनी एकूणात १२ (बारा) फ्लॅट मिळकतीचे व ४ (चार) दुकानांचे बांधकाम सुरू केलेले असून सदर संपूर्ण बांधकामास **'समृध्दी अपार्टमेंट'** असे नांव दिलेले आहे. सदर इमारतीबाबतचे घोषणा पत्र (डिड ऑफ डिक्लरेशन) दिनांक २२.०८.२०१६ रोजी दस्त क्रमांक ३४५८ नुसार महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम व महाराष्ट्र वेश्म मालकी नियम यांचे तरतुदी-नुसार सब-रजिस्ट्रार जळगांव-३ यांचे कार्यालयात नोंदविलेले आहे. सदर **'समृध्दी अपार्टमेंट'** साठी अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन स्थापन झालेली आहे त्यात तुम्हांस सभासद व्हावे लागेल. तसेच सदर घोषणा पत्रातील शर्ती व नियमावली खरेदीखतानंतर तुमचेवर बंधनकारक राहतील.

१५) सदर **'समृध्दी अपार्टमेंट'** या इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी लिहून देणार हे एक लिफ्टची व्यवस्था करुन देणार आहे. सबब सदर लिफ्ट कामी येणारा सुधार, बिघाड, दुरूस्ती खर्च वगैरे इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांनी सामाईकात हिस्सेराशीने करावयाचा आहे व त्याबाबतची सर्व जबाबदारी इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांवर राहील.